



दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com






सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक ५४ वा | सोमवार, दि. १५ सप्टेंबर २०२५ | पाने ४ | पोष्ट परवानाः - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR


# देशातील भ्रष्ट व गुन्हेगार मंत्र्यांचे काय ? त्यांच्यासाठी फाशीच्या शिक्षेचे तरतूद होईल का ?

अनेक वर्षांपासून नेपाळमधील संपूर्ण राजकीय पुढारी भ्रष्टाचाराने लिप्त होते.त्यामुळे तेथील अर्थव्यवस्था ढासळली व अनेक नवीन-नवीन समस्या निर्माण होत होत्या व नेपाळमध्ये भ्रष्टाचार उफाळल्याने तेथे बेरोजगारी, महागाई, शेतकऱ्यांच्या समस्या, शैक्षणिक समस्या अशा अनेक समस्यांचा सामना तेथील नागरिकांना व युवकांना करावा लागला. या घटनेला कंटाळून त्यांनी उग्र आंदोलनाचा पवित्रा घेतला व तेथील भ्रष्ट कारभार व घराणेशाही पाहुन युवा वर्गामध्ये आक्रोशची ज्वाला भडकली व आगबबुला होवून दिनांक ९ सप्टेंबर २०२५ ला संपूर्ण नेपाळ पेटुन उठला व तख्तापलट करून भ्रष्टाचाराला जळामुळासकट संपविण्याचा निर्णय घेतला. आता प्रश्न निर्माण होतो की भारतातील ९५ टक्के भ्रष्ट मंत्री, लोकप्रतिनिधी, जनप्रतिनिधी, स्वयंघोषित समाजसेवक, राजकीय पुढारी जे गुन्हेगारीमध्ये लिप्त आहेत, खुन, गुंडागर्दी, महिलांवरील अत्याचार अशा गंभीर गुन्ह्यांसारख्या आरोपांचा समावेश असणाऱ्यां अनेक गुन्हेगारांना सरकार कठोर शिक्षेच्या माध्यमातून फाशीच्या शिक्षेचे प्रावधान करेल काय? कारण देशातील भ्रष्ट राजकीय पुढारी देशाला पोखरून टाकले आहे. त्यामुळे कायद्याच्या माध्यमातून यांना फासावर चढविणार काय?असा प्रश्न नेपाळची परिस्थिती पाहून भारतात उपस्थित होतो. कारण आतंकवादी, खुनी, ड्रगमाफीया, बलात्कार या गुन्ह्यापेक्षा सर्वात मोठा गुन्हा म्हणजे भ्रष्टाचार कारण सर्वच गुन्हेगारीचा उगम भ्रष्टाचारामधुनच होतो.भ्रष्टाचारामुळे संपूर्ण देश पोखरल्या जातो व सर्वसामान्यांना अनेक गंभीर समस्यांचा सामना करावा लागतो.देशातील ९५ टक्के भ्रष्ट आजी-माजी राजकीय पुढारी आपली करोडोंची संपत्ती विदेशात गुंतवणूक ठेवतात व आपल्या परिवारातील मुलांचे शिक्षण विदेशात करतात.आता राजकीय पुढाऱ्यांनी नेपाळची घटना पहाता आपल्या मुलांना विदेशात न शिकता देशात शिकविण्याचा संकल्प केला पाहिजे अन्यथा नेपाळी राजकीय पुढाऱ्यांसारखे हाल देशातील भ्रष्ट राजकीय पुढाऱ्यांचे होवू शकतात यालाही नाकारता येत नाही.देशात जर ४७ टक्के अट्टल गुन्हेगार मंत्री ज्यात खून, अपहरण आणि महिलांविरोधातील गुन्हासारख्या गंभीर आरोपांचा समावेश असेल तर सर्वसामान्यांनी काय करावे! सर्वसामान्यांना कोण न्याय देणार !कारण आज राजकीय पुढारी गुन्हेगार असूनही मंत्रीपदावर किंवा लोकप्रतिनिधी पदावर मोठ्या ऐटीत विराजमान आहेत ही कीती लज्जास्पद आणि शरमेची बाब आहे.मंत्री आणि लोकप्रतिनिधी करोडो लोकांना ग्यान सांगतात आणि स्वतः अट्टल गुन्हेगारांमध्ये मोडतात व सर्वसामान्यांचे रक्त पितात ही तर लोकशाहीला काळीमा फासणारी बाब आहे.देशातील जवळपास ४७ टक्के (३०२) मंत्र्यांवर गुन्हेगारी प्रकरणे दाखल असुन, त्यामध्ये खुन, अपहरण, महिलांविरोधातील गुन्हे व अन्य गंभीर गुन्ह्यांसारखा गंभीर आरोपांचा समावेश आहे.असे निवडणूक हक्क संस्था असोसिएशन फॉर डेमोक्रॅटिक रिफॉर्म्स (एडीआर)च्या विश्लेषणातून समोर आले आहे.आज देशात कोणी गडगंज असेल तर तो फक्त राजकीय पुढारी. (एडीआय) च्या विश्लेषणा दरम्यान असेही लक्षात आले की देशातील मंत्र्यांच्या सरासरी मालमत्तेचा विचार केला तर आज प्रत्येकांजवळ कमीत कमी सरासरी मालमत्ता ३७ कोटी असल्याचे विश्लेषणा दरम्यान सांगण्यात आले. देशातील मंत्र्यांकडे २३९२९ कोटींची मालमत्ता असल्याचे सांगितले जाते ही बाब फक्त विश्लेषणातील आहे याहीपेक्षा अधिक मालमत्ता मंत्र्यांकडे व राजकीय पुढाऱ्यांकडे राहु शकते यालाही नाकारता येत नाही. म्हणजेच आज वाममार्गाने पैसा कमवीने व गुन्हेगारीचे जाळे निर्माण करने राजकीय पुढाऱ्यांचा व्यवसाय बनल्याचे दिसून येते. एडीआरने २७ राज्य विधानसभा,तीन केंद्रशासित प्रदेश आणि केंद्रीय मंत्रिमंडळातील मंत्री अशा ६४३ मंत्र्यांच्या प्रतिज्ञापत्रांचा अभ्यास केला. त्यापैकी ३०२ मंत्र्यांवर (४७ टक्के) गुन्हेगारीचे खटले दाखल आहेत. त्यात १७४ मंत्र्यावर गंभीर गुन्हे दाखल आहेत तरीही स्वतःला लोकप्रतिनिधी म्हणतात ही कसली लोकशाही म्हणावी! आपण केंद्र सरकारचा विचार केला तर केंद्रातील ७२ मंत्र्यांपैकी २९ (४० टक्के) मंत्र्यांवर गुन्हेगारी खटले दाखल आहेत.त्यात १९ मंत्र्यावर गंभीर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत ही कीती गंभीर बाब म्हणावी.देशातील राज्यांमध्ये आंध्रप्रदेश, कर्नाटक, तामिळनाडू, बिहार, ओडिशा, महाराष्ट्र, पंजाब, तेलंगणा, हिमाचल प्रदेश, दिल्ली, आणि पुदुचेरी या ११ राज्यातील विधानसभांमध्ये ६० टक्क्यांहून अधिक मंत्र्यांवर गुन्हेगारी खटले आहेत आणि ज्याठिकाणी गुन्हेगारी आली त्याठिकाणी भ्रष्टाचार १०० टक्के असतोच. त्यामुळे आता भारत भ्रष्टाचार मुक्त करण्याची गरज आहे. यासाठी भ्रष्ट राजकीय पुढाऱ्यांना कठोर शिक्षेच्या अंतर्गत फाशी शिक्षेचे प्रावधान आवश्यक आहे.कारण भ्रष्टाचारातुन गुन्हेगारीची उत्पत्ती होते.याला जर जळामुळासकट संपवायची असेल तर प्रथम कठोर कारवाई राजकीय पुढाऱ्यांवर होणे गरजेचे आहे. कारण देशातील भ्रष्ट व गुन्हेगारीने लिप्त असलेल्या राजकीय पुढाऱ्यांनी देशाला तब्बल १० वर्षे मागे ढकलले आहे.आजही देशातील अनेक आजी-माजी राजकीय पुढाऱ्यांची मुल-मुली विदेशात शिक्षण घेत आहेत व देशातील शिक्षण महागडे झाले आहे, महागाई वाढत आहे, शेतकऱ्यांच्या आत्महत्यां होत आहे, बेरोजगारी वाढत आहे यावरही सरकारने लगाम कसली पाहिजे.या संपूर्ण बाबींवर सरकारने गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. त्यामुळे या लेखाच्या माध्यमातून मान्यवरांना नम्र विनंती आहे की महामहीम राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, सर्वोच्च न्यायालय, प्रधानमंत्री, लोकसभा अध्यक्ष व सरकार यांनी गांभीर्याने लक्ष देऊन राजकीय वर्तुळातील गुन्हेगारी व भ्रष्टाचार कठोर शिक्षेच्या माध्यमातून संपवायला हवा.जय हिंद!




**रमेश कृष्णराव लांजेवार**
( स्वतंत्र पत्रकार )
मो.नं.९९२१६९०७७९,नागपूर.


## मंगळवेढ्यात सततच्या पावसाने खरीप पिकांचे मोठे नुकसान

मंगळवेढा (कटूसत्य वृत्त):- मंगळवेढा तालुक्यात ढगाळ वातारण असल्यामुळे पावसाची संततधार सुरू असल्यामुळे खरीप पिकाचे नुकसान झाले तर मजुरीवर काम करणाऱ्यांना दिवसभर घराबाहेर पडता आले नाही.

यंदाचे वर्ष शेतकऱ्याच्या दृष्टीने नैसर्गिक आपत्तीचे ठरू लागले.

दोन दिवसात ढगाळ वातावरणासह संततदार पावसाची हजेरी तर आज सायंकाळच्या सत्रात दमदार पावसाची हजेरी लागली तालुक्यामध्ये यंदाच्या खरीप हंगामामध्ये बाजरी, तुर,मका, कांदा, सूर्यफूल, उडीद या पिकाची पेरणी केली असून यंदा मक्याच्या क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली तर बाजरीच्या क्षेत्रात घट झाली. यंदा प्रथमच शेतकऱ्यांनी उडीद पिकाची पेरणी केली परंतु उडीदाला पावसाचा दणका बसल्याने अपेक्षित दर नसल्यामुळे उडीद केलेल्या शेतकऱ्यांना केलेल्या खर्चा इतके उत्पन्न मिळाले नाही.



सध्या काही शेतकऱ्यांच्या काढणी केलेल्या पिकाची मोडणी पावसामुळे करता येईना. कांदा पिकाचे देखील नुकसान झाले. यंदा मका पिकावर रोगराईचे प्रमाण कमी आहे गत पंधरवड्यामध्ये उजनी व निरेच्या लाभक्षेत्रात पडलेल्या मुसळधार पावसामुळे भीमा नदीला आलेल्या पुरात नदीकाठच्या पिकाचे नुकसान झाले त्या नुकसानीचे पंचनामे करण्यात आले. विमा कंपनीने पीक विम्याच्या भरपाईचे निकष बदलल्यामुळे अनेक शेतकऱ्यांनी विमा भरण्यापासून दूर गेले.

सततच्या पावसामुळे झालेल्या सर्व गावातील **(पान 2 वर..)**

## अक्कलकोटमध्ये ढगफुटीमुळे शेती-पिकांचे प्रचंड नुकसान

### खा. प्रणिती शिंदे यांची पूरग्रस्त भागात पाहणी




**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** अक्कलकोट तालुक्यात झालेल्या ढगफुटीमुळे मोठ्या प्रमाणात पाऊस झाला. या परिस्थितीची पाहणी करण्यासाठी खासदार प्रणिती शिंदे यांनी मोट्याळ आणि शिरवळवाडी आणि दक्षिण सोलापूर तालुक्यातील जैनापूर शिरवळ येथील तलावांना तातडीने भेट देऊन पाहणी केली.

अक्कलकोट तालुक्यातील मोट्याळ व शिरवळवाडी येथील तलावांच्या आजूबाजूची शेती पूर्णपणे पाण्याखाली गेली असून शेतातील पिकांचे प्रचंड नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाल्याने सरसकट पंचनामे करून तातडीने आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी खासदार प्रणितीताई शिंदे यांनी शासनाकडे केली.

पूरग्रस्त ग्रामस्थांना धीर देताना त्या म्हणाल्या, 'मी सदैव आपल्या पाठीशी आहे.' तसेच काही ग्रामस्थांची घरे पाण्याखाली गेल्याने त्यांना शासनाने विशेष घरकुल योजना मंजूर करावी, अशी मागणीही त्यांनी केली.

या दौऱ्यावेळी त्यांच्या सोबत तालुका काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन पाटील, जिल्हा काँग्रेस अध्यक्ष सातलिंग शटगार, माजी नगराध्यक्षा डॉ. सुवर्णा मलगोंडा, शिवानंद बिराजदार, युवक काँग्रेस अध्यक्ष निशांत कवडे, काँग्रेस कमिटी उपाध्यक्ष हर्षदीप गायकवाड, संजय प्रचंडे, युवक काँग्रेस उपाध्यक्ष गजानंद जकीकोरे, नागनाथ कापसे आदी मान्यवर उपस्थित होते.




## शिक्षकांनी आपले ज्ञान अद्यावत ठेवावे - दिलीप माने

### साने गुरुजी पतसंस्थेचा पुरस्कार सोहळा संपन्न

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** शिक्षकांनी बदलत्या आव्हानांना तोंड देण्यासाठी सज्ज रहावे.बदलते तंत्रज्ञान आत्मसात करुन आपले ज्ञान अद्यावत ठेवावे.त्याचा वापर विद्यार्थी हितासाठी करावा. असे मत सिद्धेश्वर कृषी उत्पन्न बाजार समितीचे चेअरमन दिलीप माने यांनी व्यक्त केले.

साने गुरुजी शिक्षक सहकारी पतसंस्थेच्यावतीने गुणवंत शिक्षक पुरस्कार सोहळा अरकाल गार्डन येथे पार पडला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर गुरुनाथ वांगीकर, राम गायकवाड, आप्पासाहेब पाटील, सोमेश्वर याबाजी, अनिल गायकवाड, राजेंद्र कुलकर्णी, अ.गफुर अरब, वल्लभ चौगुले आदी उपस्थित होते.शिक्षण प्रक्रीयेत शिकणे व शिकवणे ही प्रक्रीया सतत चालु असली पाहीजे. असे ही मत त्यांनी व्यक्त केले. यावेळी उपक्रमशील मुख्याध्यापक हेमावती मिठ्ठा, गुणवंत शिक्षक किरण साळुंके, आफ्रीन तारानाईक सेवाभावी सेवक नेताजी रणपिसे तर वि.मो.मेहता शाळेला आदर्श शाळा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक चेअरमन मुरलीधर कडलासकर यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सचिव आप्पाराव इटेकर, जयंत गायकवाड, महादेवी पाटील, विरभद्र यादवाड, सुनिल चव्हाण, भिमराया कापसे, सचिन चौधरी, भाऊसाहेब मोरे, उल्हास बिराजदार, धनाजी मोरे, शिवानंद हिरेमठ व फरजाना रचभरे यांनी प्रयत्न केले.कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सचिन चौधरी यांनी तर सुनिल चव्हाण यांनी आभार मानले.






## सोलापूर जिल्ह्यात अतिवृष्टीने पिकांचे नुकसान

### पंचनाम्यासाठी पाणी ओसरण्याची प्रतीक्षा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** जिल्ह्यात दोन दिवसांपूर्वी १० सप्टेंबरच्या मध्यरात्री झालेल्या अतिवृष्टीमुळे अक्कलकोट, दक्षिण सोलापूर आणि उत्तर सोलापूर तालुक्यांतील १३ महसुली मंडलांमध्ये खरीप पिकांसह ऊस पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.

या नुकसानीच्या संयुक्त पंचनाम्यांचे आदेश जिल्हा प्रशासनाने तत्काळ दिले असले, तरी शेतांमध्ये साचलेल्या पाण्यामुळे व चिखलामुळे प्रत्यक्ष पंचनाम्यांना विलंब होत आहे. गुरुवारी रात्री व शुक्रवारी पुन्हा झालेल्या पावसामुळे परिस्थिती आणखी बिकट झाली आहे. अनेक रस्ते पाण्याखाली गेले, तसेच शेतशिवारात पाणी साचल्याने महसूल, कृषी आणि ग्रामपंचायत विभागांचे कर्मचारी बाधित भागात पोहचू शकले नाहीत.

सोलापूर जिल्ह्यातील अनेक भागांत अतिवृष्टीमुळे शेतकरी अडचणीत सापडले आहेत. नुकसानभरपाईसाठी आवश्यक असलेली प्रक्रिया सुरू करण्यात आली असली तरी निसर्गाची अडथळा अजूनही प्रशासनासमोर आव्हान ठरत आहे.



पावसाचे थैमान थांबल्यानंतरच पंचनाम्यांची प्रक्रिया पूर्णत्वास नेली जाईल. दरम्यान, शेतांमध्ये अजूनही पाणी असून, काही भागांत चिखलामुळे जाणे अशक्य झाले आहे. मात्र जिथे अडचणी नाहीत अशा ठिकाणी पंचनाम्यांची सुरुवात झाली आहे.

पाऊस थांबल्यास कामाला वेग येईल, असे निवासी उपजिल्हाधिकारी अभिजित पाटील यांनी सांगितले. तर जिल्हा कृषी अधीक्षक शुक्राचार्य भोसले म्हणाले, की संयुक्त पंचनाम्यांचे आदेश देण्यात आले आहेत. मात्र अजूनही अनेक शेतांमध्ये पाणी साचलेले आहे. रस्त्यांची स्थितीही खराब आहे. त्यामुळे कर्मचारी शिवारात पोचू शकलेले नाहीत. पाऊस थांबून पाणी ओसरेल, तेव्हाच पंचनाम्यांना गती मिळेल, असे सांगितले.

## सोलापूरात पावसाचा हाहाकारः रिक्षाचालक गेला वाहून



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर शहरासह जिल्ह्यात चार दिवसांपासून मुसळधार पाऊस होत आहे. जोरदार पावसाने झोडपून काढल्याने पूरस्थिती निर्माण झाली असून अनेक भागात पाणी साचले आहे.

दरम्यान सोलापुरात पुन्हा एकदा रात्री मुसळधार पाऊस झाला. यामुळे रस्त्यावरून पाणी वाहत असून छत्रपती संभाजी महाराज चौका जवळील पुना नाका येथे पुलावरून वाहणाऱ्या पाण्यातून रिक्षा टाकल्याने एक रिक्षा चालक वाहून गेल्याची घटना घडली आहे.

सोलापूर जिल्ह्याला जोरदार पावसाचा तडाखा बसत आहे. यातच सोलापूर शहर परिसरात ११ सप्टेंबरला जोरदार पावसाने झोडपून काढले होते. या पावसामुळे मार्केट परिसरात पाणी साचल्याने दुकानांमध्ये पाणी शिरले होते. शिवाय काही भागातील घरांमध्ये पाणी गेल्याने घरातील साहित्याचे देखील मोठे नुकसान झाले होते. परिणामी जनजीवन विस्कळीत झाले होते. यानंतर पुन्हा एकदा सोलापूरमध्ये जोरदार पावसाचा तडाखा बसला आहे.

मध्यरात्रीच्या सुमारास सोलापूर शहर व परिसरात जोरदार पाऊस झाला. यामुळे नाल्यांना पूर देखील आला होता. दरम्यान सोलापुरातील छत्रपती संभाजी महाराज चौकजवळ असलेल्या नाल्यावरील पुलावर प्रचंड पाणी वाहत असताना रिक्षाचालकाने पुलावरून गाडी नेण्याचा प्रयत्न केला. यात तो वाहून गेल्याची घटना घडली आहे. सतीश सुनील शिंदे **(पान 2 वर..)**

# आपात्कालीन परिस्थितीत नागरिकांनी सुरक्षित आणि सतर्क रहावे - किसन जाधव



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर शहर जिल्ह्यामध्ये गेल्या आठवड्यापासून पावसाने हाहाकार माजवला असून झालेल्या पावसामुळे अनेक सखल भागांमध्ये पाणी शिरले आहे ज्यामुळे नागरिकांच्या घरात हे पाणी पोहोचले आणि जनजीवन विस्कळीत झाले आहे अनेक भागांमध्ये पूर सदृश्य परिस्थिती निर्माण झाली असून नागरिकांना मोठे नुकसान सहन करावे लागत आहेत. दरम्यान सोलापूर महानगरपालिका प्रभाग क्रमांक २२ येथील एसएलबी रिक्षा स्टॉप, गोली वडापाव, उदय विकास प्रशाला, यतीमखाना, रामवाडी धोंडीबा वस्ती, मोठी इरण्णा वस्ती, गैबी पीर नगर, सनत नगर परिसरात देखील मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले असून अनेक घरांमध्ये पावसाचे पाणी शिरले आहे यामुळे येथील नागरिकांचे मोठे नुकसान झाले आहे याच पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष किसन जाधव यांनी सोलापूर महानगरपालिका झोन क्रमांक ६ चे विभागीय अधिकारी पानगल, मंडल अधिकारी भीमाशंकर बुरले, ज्युनियर इंजिनियर ओंकार शिंदे, देवकर, इलाई शेख, शिराज रजाक वकील शेख, पप्पू शेख, शिराज शेख, सिकंदर शेख, इरफान शेख,पवन खांडेकर, स्वप्नील आठवले, फिरोज पठाण, सिद्धू गायकवाड, दिनेश चलवादी, मनोज चलवादी, चंद्रकांत चालवादी, प्रमिला स्वामी, प्रमिला बिराजदार, समद मिस्तरी, शेख लियाकत, बक्सू मामा शेख, पप्पू शेख, एजाज शेख, जब्बार पटेल, काशिनाथ वनकोळे, लल्ला जाधव, सत्तार चाचा पटेल, जाकीर शेख, रमेश चलवादी, राजू बेळेनवरू, हारुण शेख, वसंत कांबळे, महादेव राठोड आनंद गाडेकरयांच्या समवेत आपातकालीन परिस्थितीची पाहणी केली यावेळी किसन जाधव यांनी सोलापूर शहर मध्य विधानसभा मतदारसंघाचे आमदार देवेंद्र कोठे, सोलापूर महानगरपालिकेचे आयुक्त डॉ.सचिन ओंबासे, अतिरिक्त उपायुक्त रवी पवार, संदीप कारंजे, नगर अभियंता सौ.सारिका अकुलवार, सोलापूर महानगरपालिका आपातकालीन विभाग व जिल्हा आपातकालीन विभाग यांना भ्रमणध्वनी द्वारे संपर्क साधून प्रभाग क्रमांक २२ येथील मुसळधार पावसामुळे झालेल्या नुकसानीच्या संदर्भात माहिती देऊन तत्काळ येथील नागरिकांना आर्थिक मदत अथवा बचाव कायासाठी प्रशासकीय यंत्रणांना तत्काळ सूचना देण्यात याव्यात आणि या पुढील काळात अशी परिस्थिती उद्भवणार नाही याची दक्षता संबंधित यंत्रणांनी घ्यावी अशी मागणी देखील किसन जाधव यांनी यावेळी केली. नागरिकांनी देखील आपत्कालीन परिस्थितीमध्ये सतर्क राहावे असे आव्हान देखील यावेळी जाधव यांनी केले.

लवकरच या परिसरात पूर्व स्थीती निर्माण होईल यासाठी आपत्कालीन परिस्थितीत प्रशासन सज्ज आहे. नागरिकांनी सतर्क आणि निश्चिंत राहावे असेही यावेळी किसन जाधव म्हणाले. या मुसळधार पावसामुळे धोंडीबा वस्ती येथील अखिल शेख यांच्या कुटुंबामध्ये विवाह संपन्न झाले होते परंतु मैला मिश्रित पाणी घरामध्ये शिरल्याने मोठे नुकसान झाले परिसरात देखील आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे तसेच यतीमखाना परिसर येथे सर सय्यद प्रशाला उदय विकास प्रशाला येथे देखील मैला मिश्रित ड्रेनेच्या पाण्यामुळे नाहक त्रास सहन करावा लागत आहे ही बाब अत्यंत गंभीर असून आरोग्याच्या दृष्टीने प्रशासनाने जातीने लक्ष घालून त्वरित हा प्रश्न मार्गी लावावा तसेच इराण वस्ती येथे अतिवृष्टी मुळे घरांचे पडझड होऊन अनेक नागरिकांचे संसार उघड्यावर आले आहेत यावर प्रशासनाने तत्काळ मदत व बचाव कार्य युद्ध पातळीवर सुरू करावे अशी मागणी देखील किसन जाधव यांनी केले. दरम्यान आमदार देवेंद्र कोठे पालिका आयुक्त डॉक्टर सचिन ओंबासे यांच्यासह आपातकालीन विभागातील संबंधित अधिकाऱ्यांनी सकारात्मकता दाखवत त्वरित बचाव कार्य सुरू केल्याचेही यावेळी किसन जाधव म्हणाले. अति मुसळधार पावसामुळे प्रभाग क्रमांक २२ मध्ये आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे त्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. उद्भवलेल्या परिस्थितीवर प्रशासनाने नियंत्रण आणावे अशी मागणी देखील जाधव यांनी प्रशासनाकडे केले.

# सपोनि नेताजी बंडगर यांचा राष्ट्रपती शौर्य पुरस्कार मिळाल्याबद्दल सत्कार



**माढा (कटूसत्य वृत्त):-** पोलीस खात्यात उल्लेखनीय व उत्कृष्ट कामगिरी बजाविल्याबद्दल माढा पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक नेताजी बंडगर यांना राष्ट्रपती शौर्य पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचा यथोचित सत्कार विठ्ठलवाडीचे आदर्श शिक्षक राजेंद्र गुंड सर व लोंढेवाडीचे कवी बाबासाहेब लोंढे यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी आदर्श शिक्षक राजेंद्र गुंड सर यांनी सांगितले की, आजच्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या व सोशल मीडियाच्या युगात प्रत्येक क्षेत्रात जबाबदारीने व प्रामाणिकपणे कर्तव्य बजावणे ही मोठी तारेवरची कसरत आहे. विशेषतः पोलीस खात्यात सेवा बजाविताना वरिष्ठ अधिकाऱ्यांना अडचणीच्या वेळी मोठी जोखीम घ्यावी लागते.सपोनि नेताजी बंडगर हे एक शिस्तप्रिय व धाडसी अधिकारी आहेत. हाताखालील कर्मचाऱ्यांकडून सर्व कामे योग्य पद्धतीने करुन घेण्यासाठी ते विविध कौशल्ये व अनुभवाचा कुशलतेने वापर करतात. सध्याच्या युगात सायबर गुन्हेगारी रोखणे हे मोठे आव्हान पोलीस प्रशासनासमोर असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी कवी बाबासाहेब लोंढे यांनी सांगितले की, पोलीस खात्यातील काही अधिकारी उत्तम प्रशासनासोबतच सामाजिक बांधिलकीही जपण्याचे मनोमन काम करतात.याच पद्धतीने सपोनि नेताजी बंडगर यांनी प्रभावीपणे काम केले आहे त्यामुळे त्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना राष्ट्रपती शौर्य पुरस्काराने सन्मानित केले आहे. ही बाब निश्चितच कौतुकास्पद व प्रेरणादायी असून माढा पोलीस स्टेशनच्या दृष्टीने ऐतिहासिक असल्याचेही त्यांनी सांगितले.

सत्काराला उत्तर देताना सपोनि नेताजी बंडगर यांनी सांगितले की,पोलीस खात्यात उत्कृष्ट व प्रामाणिकपणे काम करणाऱ्यांचा नक्कीच सन्मान होतो.प्रत्येक ठिकाणी काम करताना कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले आहेत.गुन्हेगारी रोखण्याबरोबर पर्यावरण संवर्धनासाठी प्रयत्न करण्याचा मानस आहे.माढा पोलीस स्टेशनच्या हद्दीतील अनेक गावातील शिक्षक, डॉक्टर, पत्रकार, पोलीस पाटील, साहित्यिक यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी जो माझा सत्कार केला आहे त्यामुळे आणखी जोमाने व जबाबदारीने काम करण्याची प्रेरणा मिळाल्याचे त्यांनी आवर्जून सांगितले आहे.

यावेळी माढा पोलीस स्टेशनमधील अधिकारी व पोलीस कर्मचारी उपस्थित होते.

# लाँड्री चालकानं दोन लाखांचे दागिने केले परत



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोन्याने लाखाचा टप्पा गाठला आहे. यामुळे सोने खरेदी करणे हे सामान्यांच्या कक्षेतून बाहेर जात आहे,तरीही सर्व सामान्य घरातील एका प्रामाणिक लाँड्री चालकाने ग्राहकाने इस्त्रीसाठी दिलेल्या कपड्यात राहिलेले जवळपास दोन लाखांचे दागिने प्रामाणिकपणे परत दिले. कुमठा नाका परिसरातील स्वागत नगर येथील विलास सरफळे असे त्या प्रामाणिक लाँड्री चालकाचे नाव आहे. यामुळे त्यांचा पेढे भरवून ग्राहक युवराज डिगे यांनी बुधवारी सत्कार केला. 'ग्राहक युवराज यांनी शनिवारी दि.६ आपले कपडे इस्त्री करण्यासाठी विलास यांच्याकडे दिले; पण त्यात नजरचुकीने सोन्याचे दागिने परत घेताना डावीकडून ग्रंथमित्र पुंडलिक मोरे, ग्राहक युवराज डिगे, लाँड्री चालक विलास सरफळे आणि त्यांची पत्नी मीना. पॅन्टच्या खिशामध्ये अर्धा तोळ्याच्या सोन्याच्या दोन अंगठ्या आणि चार तोळे चांदीचे ब्रासलेट राहिले होते; हे मला माहीतच नव्हते. त्यानंतर युवराज हे घरात दागिने शोधत होते, पण त्यांना मिळाले नाही. त्यांनी जवळपास दोन दिवस घरात' सांगण्यावरून युवराज हे विलास यांच्या शोधा शोध केली. शेवटी आईच्या दुकानात जाऊन एकदा विचारणा केली.मोबाइल नंबर माज्याकडे नव्हता, म्हणत तेव्हा विलास यांनी लगेच उत्तर देत, तुमचा पळत जाऊन दागिने आणून दिले. हरवलेले दागिने पुन्हा पाहून खूप त्यांचा आनंदावर पारा राहिला नाही.लगेच त्यांनी विलास यांना पेढे भरविले, विलास सरफळे हे ३२ वर्षे टेक्सटाईलमध्ये नोकरी करून सेवानिवृत्त आहेत. या प्रामाणिकपणाबद्दल कौतुक होत आहे.

# सुरेश पाटोळे यांना समाज भूषण पुरस्कार घोषित



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** इंदिराबाई गायकवाड चॅरिटेबल ट्रस्ट, नवी मुंबई यांच्यावतीने देण्यात येणारा समाज भूषण पुरस्कार सोलापूर येथील मातंग समाजाचे ज्येष्ठ नेते , क्रांतीवीर लहुजी शक्ती सेनेचे प्रदेशाध्यक्ष तथा राज्य समन्वयक सकल मातंग समाज महाराष्ट्र राज्य, सुरेश पाटोळे यांना घोषित करण्यात आला आहे.

सुरेश पाटोळे हे मागील २५ वर्षापासून मातंग समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक सांस्कृतिक आणि आर्थिक उन्नतीसाठी निस्वार्थीपणे काम करत आहेत. त्यांनी लष्कर येथे साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे सार्वजनिक वाचनालयाची स्थापना केली आहे. या वाचनालयाच्या माध्यमातून स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना मोफत मार्गदर्शन केले जाते. सोलापूर शहरात साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांचा पूणार्कृती पुतळा बसवण्यासाठी सुरेश पाटोळे यांनी विशेष प्रयत्न केले होते. सुरेश पाटोळे दरवर्षी मोफत आरोग्य शिबिर, नेत्र रोग तपासणी आणि शस्त्रक्रिया शिबिर सामुदायिक विवाह सोहळा यांचे आयोजन करतात. अनुसूचित जाती आरक्षण वर्गीकरणाच्या राज्यव्यापी चळवळीत ते सक्रिय आहेत. मातंग समाजावर होणाऱ्या अन्याय अत्याचाराविरुद्ध निवेदने,मोर्चे आणि आंदोलने यांच्या माध्यमातून त्यांनी वेळोवेळी आवाज उठवला आहे. त्यांच्या कामाची दखल घेऊन इंदिराबाई गायकवाड चॅरिटेबल ट्रस्ट,नवी मुंबई या संस्थेने त्यांना यावषीर्चा समाजभूषण पुरस्कार देण्याचे घोषित केला आहे. पुरस्काराचे स्वरूप शाल,श्रीफळ, स्मृतिचिन्ह आणि रोख २१०० -/- असे आहे. ही घोषणा संस्थेचे अध्यक्ष दिलीपकुमार राजेंद्र गायकवाड यांनी केली आहे. पुरस्कार वितरण सोहळा २० सप्टेंबर 2025 रोजी विष्णुदास भावे सभागृह, वाशी,नवी मुंबई येथे होणार आहे.

# अण्णाराव कुंभार जिल्हा मुख्याध्यापक जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** नेताजी सुभाषचंद्र बोस शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अण्णाराव कुंभार यांना जिल्हा मुख्याध्यापक संघाच्यावतीने मुख्याध्यापक जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. मोहोळ येथील गायकवाड सभागृहात आयोजित कार्यक्रमात शिक्षक आ.जयंत आसगावकर, माजी आमदार दत्तात्रय सावंत, शिक्षण उपसंचालक गणपत मोरे, राज्य मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष सुभाष माने, जिल्हा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष तानाजी माने, शहर मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष विद्यानंद स्वामी आदी मान्यवरांच्या हस्ते अण्णाराव कुंभार व ललीता कुंभार यांचा सन्मानचिन्ह, सन्मानपत्र,पाच हजार रुपयांचे धनादेश, शाल ,श्रीफळ, पुष्प गुच्छ देऊन सन्मानित करण्यात आला. अण्णाराव कुंभार यांनी १९७४ ते २००४ पर्यंत मुख्याध्यापक संघाचे कार्य केले. तीस वर्षांच्या काळात मुख्याध्यापक संघाचे सदस्य, सहसचिव, सचिव, उपाध्यक्ष, अध्यक्ष, राज्य मुख्याध्यापक सचिवपदी कार्य करताना शिक्षण क्षेत्रातील विविध प्रश्न शासन दरबारी मांडून न्याय दिल्याबद्दल मुख्याध्यापक जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आल्याचे जिल्हा अध्यक्ष तानाजी माने यांनी सांगितले. यावेळी माजी आ.दत्तात्रय सावंत, आ.जयंत आसगावकर ,सुभाष माने आदीनी कुंभार याच्या कायार्चे गौरव केले.यावेळी अण्णाराव कुंभार म्हणाले, जिल्हा मुख्याध्यापक संघात तीस वर्षे कार्य करताना शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, मुख्याध्यापक यांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न केल्याचे सांगितले.राज्यात सोलापूर जिल्हा मुख्याध्यापक संघ आदर्श बनविण्यासाठी तसेच मुख्याध्यापक भवन बांधण्यासाठी प्रयत्न केल्याचे सांगितले. यावेळी संस्था हितचिंतक रेवणसिद्ध रोडगीकर, सुभाष धुमशेट्टी, विजयकुमार हुल्ले, श्री बृहन्मठ होटगी संस्थेचे आजी व माजी शिक्षक वृंद यांच्यासह नेताजी सुभाषचंद्र बोस शिक्षण संस्थेचे मुख्याध्यापक रविशंकर कुंभार, मुख्याध्यापक शिवानंद मेणसंगी, मुख्याध्यापिका वैशाली कुंभार, मुख्याध्यापिका विजयालक्ष्मी कुंभार, पर्यवेक्षक गौरीशंकर आळंगे यांच्यासह संस्थेचे सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद उपस्थित होते.

# अंध महिलांच्या भारतीय क्रिकेट संघाच्या उपकर्णधार पदी सोलापूरच्या कु. गंगा कदम हिची निवड



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** बेंगलोर येथे क्रिकेट असोशिएशन फॉर दि. ब्लाइंन्ड इन इडिया यांचेवतीने दिनांक 11/09/2025 रोजी घेणेत आलेल्या बैठकी मध्ये आगामी काळात होण-या पहिल्या वहिल्या अंध महिलांच्या टि-20 विश्वचषक क्रिकेट स्पर्धेसाठी भारतीय संघाची निवड जाहीर करणेत आली. यात महाराष्ट्रातील खेळाडू कु. गंगा संभाजी कदम हिची उपकर्णधार म्हणून करण्यात आली.

तर कर्नाटकच्या दिपीका टी.सी. या मुलीची कर्णधार म्हणून निवड करणेत आली आहे. कु. गंगा कदम ही सोलापूरची रहिवासी असुन तिच्या निवडीमूळे सोलापूरच्या शिरपेचात मानाचा तूरा रोवला गेला आहे.

विश्वचषकातील सामने हे दिनांक 11/11/2025 ते 25/11/2025 दरम्यान दिल्ली, बेंगलोर व काठमांडू (नेपाळ) येथे होणार आहेत.

या विश्वचषक स्पर्धेमध्ये ऑस्ट्रेलीया, इंग्लंड, भारत, अमेरीका (युएसए), पाकिस्तान, श्रीलंका व नेपाळ या 7 देशांचे संघ सहभागी होणार आहेत. तिच्या या निवडीबद्दल सबंध महाराष्ट्रातून तिचे कौतूक होत आहे .सोलापूरातील उद्योजक श्री. राजेश दमाणी, भैरुरतन दमाणी अंध शाळेचे सचिव, श्री. संतोष भंडारी व मुख्याध्यापक श्री. प्रकाश दर्शणाळे यांनी अभिनंदन केले.

कु. गंगा संभाजी कदम हिचा जन्म एका शेतमजुर कुटूंबात झाला. तिच्या घरी एकूण 8 बहिणी व एक भाऊ असा परिवार आहे. गंगा हिची घरची आर्थीक परिस्थिती अत्यंत हालाकीची असून सोलापूर येथील भैरुरतन दमाणी अंध शाळा सोलापूर या निवासी अंध शाळेत तिचे शालेय शिक्षण झाले. शालेय शिक्षण घेत असताना शाळेतील मुले क्रिकेट खेळत असलेली पाहुन तिलाही क्रिकेटची आवड निर्माण झाली.

शाळेतच तिने क्रिकेट शिकण्याचा हट्ट धरला होता. इयत्ता सातवीत शिकत असल्यापासुन तिला क्रिकेट खेळाचे धडे मिळाले. तिनेही क्रिकेट अगदी मन लावुन जिद्दीने शिकले आहे. सन 2017 मध्ये नाशिक येथे पार पडलेल्या पहिल्या अंध महिलांच्या क्रिकेट स्पधेमध्ये पश्चीम महाराष्ट्र संघातुन सोलापूरच्या एकूण 6 मुली सहभागी होत्या. त्यात गंगा हिचा समावेश होता. या स्पर्धेत पश्चीम महाराष्ट्र संघाच्या अर्ध्यापर्यंतही इतर संघ पोहचु शकले नाहीत. या स्पर्धेत पश्चीम महाराष्ट्र संघाने निर्विवाद आपले वर्चस्व सिध्द केले. या स्पर्धेची मालिकावीर म्हणुन गंगा कदम हिला सन्मानीत करणेत आले होते.

तेव्हा पासुन अर्थात सन 2017 पासुन ते आज तागायत ती महाराष्ट्र राज्य अंध महिला क्रिकेट संघाची कर्णधार आहे. सन एप्रिल 2023 मध्ये भोपाळ येथे झालेल्या निवड शिबीरात गंगा हिने पहिल्या वहिल्या भारतीय अंध महिला क्रिकेट संघात आपले स्थान निश्चीत केले. भारतीय संघाची पहिली आंतरराष्ट्रीय मालीका ही नेपाळ या देशात झाली. त्यात भारतीय संघाकडुन गंगा कदम हिने आपल्या उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले होते. International Blind Sports Association यांचे वतीने बरमींगहॅम इग्लंड येथे आयोजीत अंध महिलांच्या जागतीक क्रिकेट स्पर्धेमध्ये भारतीय अंध महिला क्रिकेट संघाने अंतिम सामन्यात ऑस्ट्रेलीयाचा पराभव करुन सुवर्ण पदक प्राप्त केले.

यात कु. गंगा कदम हिने भेदक गोलंदाजी करताना 2 ओवर मध्ये 3 बळी घेतल्या तिच्या या उत्कृष्ट कामगीरीमुळे भारतीय संघास सुवर्ण पदक प्राप्त झाले होते.

जानेवारी 2025 मध्ये झालेल्या राष्ट्रीय क्रिकेट सामन्यात तिने तेलंगणा विरुध्दच्या सामन्यात 77 चेंडुत 14 चौकारांच्या मदतीने 131 धावांची उत्कृष्ट खेळी करत महाराष्ट्र संघाला विजय मिळवून दिला. दिनांक 01/09/2025 ते 05/09/2025 दरम्यान बैंगलोर येथे झालेल्या विभागीय भारत स्पर्धेत साखळी सामन्यातील सर्व तिनही सामने जिंकत अंतिम सामन्यात दक्षिण भारत संघाचा 30 धावांनी पराभव करत मालिका जिंकली.

कु. गंगा या मालिकेची मालिकावीर ठरली. गंगा ही पश्चीम भारस संघाची कर्णधार होती. घरची अतिशय हालाकीची परिस्थिती असताना 8 बहिणींमध्ये ही स्वतः अंध असताना परिस्थितीशी योग्य लढा देऊन कु. गंगा कदम हिने हे यश प्राप्त केले. तिचे शालेय शिक्षण सोलापूरातील भैरुरतन दमाणी अंध शाळेत झाले व उच्चमाध्यमीक शिक्षण सोलापूर येथील हरीभाई देवकरण कनिष्ठ महाविद्यालय सोलापूर येथे झाले. तर पदवी तिने मुंबई येथील किर्ती कॉलेजमध्ये कला विभागात प्राप्त केली.सोलापूर येथील जामश्री इलिजीअयम क्रिकेट क्लब दमाणीनगर सोलापूर येथे ती सध्या प्रशिक्षक राजू शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली क्रिकेटचा सराव करत आहे.

# ग्रंथपालन परीक्षेत कविता माने केंद्रात प्रथम



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** ग्रंथालय संचालनालय महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे मार्फत घेण्यात आलेल्या ग्रंथपालन प्रमाणपत्र परीक्षा - 2025 परीक्षेत 700 पैकी 439 गुण मिळवून कविता नागेश कविता नागेश माने प्रथम, 411 गुण मिळवून मुश्रीफ शेख द्वितीय, 410 गुण मिळवून प्रतिभा हरिश्चंद्र पिंगळे तृतीय आल्या. महाराष्ट्र राज्यातून 1464 विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली होती. पैकी 845 विद्यार्थी पास होऊन 58% निकाल लागला. सोलापूर केंद्रातून 79 विद्यार्थ्यांपैकी 41 विद्यार्थी उत्तीर्ण होऊन 52% निकाल लागला. जानेवारी 2025 ते जून 2025 या सहा महिन्याच्या कालावधीत राज्यात 24 जिल्ह्यात हा वर्ग चालविला होता. जून 2025 अखेरीस परीक्षा झाल्या होत्या. कविता माने, मुश्रीफ शेख यांचा सत्कार गुणपत्रक, ग्रंथभेट आणि बुके देऊन वर्गव्यवस्थापक ग्रंथमित्र कुंडलिक मोरे, लिपिक सारिका माडीकर, सेवक गीतांजली गंभीरे, देगाव सार्वजनिक वाचनालयाच्या ग्रंथपाल राजश्री माशाळकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. वर्गाचे मुख्याध्यापक अविनाश गायकवाड, ग्रंथालय संघाचे अध्यक्ष ग्रंथमित्र विजयकुमार पवार, उपाध्यक्ष पांडुरंग सुरवसे, कार्यवाह साहेबराव शिंदे, वर्गशिक्षक गणेश फंड, दत्ता मोरे, विनोद गायकवाड वृषाली हजारे यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अॅडमीट करण्याची सोय

**निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

-: संपर्क :-

8083608083
9922646566
8698732109

(सरकार मान्य)

**अथर्व पेस्ट कंट्रोल**

An ISO 9001-15
सर्टीफाईड कंपनी


प्रोप्रा. हरी सुभाष विरपे

9822964815
9421984815

झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) ख्रिश्चन धर्मियांचा एक सण, ख्रिसमस २) डोके ३) गुणी, प्रामाणिक वृत्तीचा ४) दह्यात पाणी मिसळून हे तयार करतात ५) जेवणासाठी बसलेली रांग ६) हात ८) एक पक्षी ९) आश्चर्य १०) नगरचे माजी खासदार-*** विखे-पाटील ११) एक भारतीय गोलंदाज-यजुवेंद्र *** १२) शर्ट १३) इच्छा १४) दिलेले आश्वासन, वचन १५) लहान मूल १६) एक मराठी अभिनेत्री-*** प्रभुणे १७) वेडसर (हिंदीत) १८) शर्टची गळ्याभोवतीची पट्टी १९) धावपट्टू (इंग्रजीत) २१) पावसाची आतुरतेने वाट पाहणारा पक्षी २२) वस्तूंवर लावलेला टॅक्स, कर २३) कंबर (हिंदीत) २४) आत, आतील बाजूस (हिंदीत) २५) जवळ, समीप २६) खोलगट २७) काजूच्या जोडीचा एक पौष्टीक पदार्थ २८) दोन आणि अर्धा २९) शिवसेनेचे मुखपत्र ३०) पोट ३१) वायू, वारा ३२) कर्मवीर भाऊराव पाटील यांनी स्थापन केलेली शिक्षणसंस्था ३४) शपथ (हिंदीत) ३५) मनुष्य ३६) शंभर धावांचा टप्पा ३७) गाडीची गती ३८) गुलाम ३९) मनी नाही ** अन् देवा मला पाव

**आडवे शब्द :** १) उत्तर महाराष्ट्रातील एक जिल्हा ३) खा. उदयनराजे यांचा लोकसभा मतदारसंघ ५) बीडच्या एक नेत्या-*** मुंडे ७) वायर, धातूचा तंतू ८) लहान मुलाचा सांभाळ करणारे आई वडील, एक भाजी प्रकार ९) छोटे शहर ११) एक अंमली नशिला पदार्थ १२) पतीची दुसरी बायको १३) शर्टला बटण अडकविण्यासाठी केलेली खाच १४) स्तुती १५) ढग (हिंदीत) १६) वेळ (हिंदीत) १७) पैंजण (हिंदीत) १८) पूर्वीचा एक साथीचा रोग १९) एक अभिनेत्री-*** टंडन २०) हनुमानाच्या हातातील शस्त्र २१) वाहन चालविणारा २२) लालू प्रसाद यादव यांचा पक्ष-राष्ट्रीय *** दल २४) दोन्हीमधील तफावत २५) होकारच्या विरूध्दार्थी २६) विषमच्या विरूध्दार्थी २७) पाण्यावर तरंगणारा एक पक्षी २८) महाराष्ट्राचे एक नेते -*** पवार २९) शुगर, शर्करा ३०) मोठ्या मनाचा ३१) पडून राहिलेली जमीन ३२) वाळूवर रेषा काढून भविष्य जाणण्याची पध्दत ३३) धमकी देणे, संयम, धीर ३४) संरक्षक आवरण ३५) पत्राचा सुरूवातीचा मजकूर ३७) बैलाच्या नाकात घातलेली दोरी ३८) दान करण्याची वृत्ती ३९) शिजवलेला तांदूळ ४०) दोन नद्यांचा मिलाफ ४१) सशाची आणि याची शर्यतीची गोष्ट प्रसिध्द आहे ४२) जावकच्या विरूध्दार्थी शब्द

## सुडोकु - 54

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 3 | 8 | | | 4 | | | 2 |
| | | 2 | 5 | | | 4 | 3 | |
| | 7 | 9 | 1 | 3 | | 5 | | 6 |
| | | | 6 | 8 | | 7 | | 1 |
| | | | | 1 | | | 4 | |
| | 1 | | | 2 | | | | 5 |
| 7 | 2 | | 3 | | | | 5 | |
| 3 | 4 | 5 | | 7 | | 6 | 2 | |
| | 9 | | | 5 | 6 | 3 | 7 | |

# वारकरी प्रतिष्ठानच्या वतीने पुरस्कार वितरण संपन्न

## पाटील व कवडे यांना 'वारकरी सेवा भूषण' पुरस्काराने तर कौशिक गायकवाड यांना 'समाज गौरव' पुरस्काराने सन्मानित

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** भाद्रपद महिन्यातील श्राद्ध पक्ष प्रारंभी श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर सभामंडप, पंढरपूर येथे वारकरी प्रतिष्ठान यांचे माध्यमातून तुळशी अर्चना व श्रीमदभागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळा आयोजित करण्यात आला होता. त्यामध्ये ह भ प सुधाकर इंगळे महाराज हे कथाकार असून दररोज स. भजन, दु. 2.00 वा. श्रीमदभागवत कथा व रात्री कीर्तनसेवा आयोजित करण्यात आली होती. कार्यक्रमाची सुरुवात ह भ प भागवत चवरे महाराज (पंढरपूर), ह भ प श्रीरंग औसेकर महाराज, ह भ प तानाजी बेलेराव यांच्या हस्ते ग्रंथ व वीणा पूजन करून करण्यात आली .



" तुका म्हणे येथे भजन प्रमाण` " या न्यायाने दररोज वेगवेगळ्या भजनी मंडळचे भजनाने प्रारंभ झाला असून त्यामध्ये श्री सदगुरु सुधाकर इंगळे महाराज सेवा समितीच्या वतीने पुरस्कार वितरण केले गेले. "वारकरी सेवा भूषण" या पुरस्काराने संजय पाटील महाराज व संतोष कवडे यांना सन्मानित केले.

तसेच कौशिक तात्या गायकवाड यांना " समाज गौरव " पुरस्काराने सन्मानित केले. समाजातील सेवाभावी व्यक्तीचा सन्मान हा इतरांच्या साठी प्रेरणादायी ठरते म्हणून पुरस्कार देण्याचा संकल्प केला असे विचार तुकाराम भोसले महाराज यांनी आपल्या मनोगता मध्ये मांडले. श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती सभामंडप, पंढरपूर येथे पुरस्कृत केल्यामुळे जीवन सफल झाले अशी भावना त्यांनी व्यक्त केली. या कार्यक्रमासाठी माधव महाराज नामदास (संत नामदेव महाराज 16 वे वंशज), राजेंद्र शेळके साहेब (मुख्य कार्यकारी अधिकारी),किरणराज घाडगे शिवाजी महाराज (नारायणगड), प्रसाद महाराज अंमळणेरकर , नामदेव शास्त्री सानप महाराज (भगवानगड), जोतिराम चांगभले, इ. अधिकारी व महंत विभूतीनी सदिच्छा भेट दिली. या कार्यक्रमाचे आयोजन तुकाराम भोसले महाराज (राष्ट्रीय अध्यक्ष विश्व वारकरी सेना), पुरुषोत्तम सुरवसे महाराज, आदर्श इंगळे महाराज यांनी वारकरी प्रतिष्ठानच्या वतीने केले होते. या सोहळ्यासाठी महिला व पुरुष भाविकाची मोठया प्रमाणात उपस्थिती होती.

# मनोरमा मल्टीस्टेटच्या मुख्य कार्यालयाचे आ. रणजितसिंह मोहिते पाटील यांच्या शुभहस्ते उद्घाटन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** मनोरमा मल्टीस्टेट को ऑपरेटीव्ह क्रेडीट सोसायटी च्या इंदिरा नगर विजापूर रोड सोलापूर येथील मुख्य कार्यालयाचे उद्घाटन आमदार रणजितसिंह मोहिते पाटील यांच्या शुभहस्ते रविवारी पार पडले.

त्यावेळी रणजितसिंह मोहिते म्हणाले की, सहकार क्षेत्रात मोठे बदल होत आहेत.

त्यानुसार बदल स्वीकारून कामाची व्याप्ती वाढविणे गरजेचे आहे. मनोरमा परिवाराचे सूत्रधार श्रीकांत मोरे व शोभा मोरे हे अत्यंत कुशल मार्गदर्शक आहेत. ते सहकार क्षेत्रातील अभ्यासक देखील आहेत. त्यामुळे हा परिवार प्रगती पथावर आहे. शिवाय ही नुतन वास्तू सहकार क्षेत्राच्या वैभवात भर टाकेल आम्ही सदैव सोबत राहू असे सांगून मनोरमा परिवाराच्या वाटचालीचे कौतुक केले.



श्रीकांत मोरे म्हणाले की, मोहिते पाटील व मनोरमा परिवार सहकार क्षेत्राच्या विकासाची गंगा नेटाने पुढे नेण्याचे काम करेल. दोन्ही घराण्याचे ऋणाबंध पुढची पिढी कायम ठेवतील असा आशावाद व्यक्त केला. माजी शिक्षणाधिकारी प्रदिप मोरे यांनी मोरे व मोहिते पाटील यांच्यातील तीन पिढ्याचे सौख्य असल्याचे सांगून शिक्षण क्षेत्रात देखील मोहिते पाटला च्या मार्गदर्शनात मला चांगले काम करता आल्याचे त्यांनी सांगितले.

मनोरमा मल्टीस्टेटच्या चेअरमन शोभा मोरे यांनी मनोरमा मल्टीस्टेट च्या एकंदरीत व्यवसायाच्या प्रगतीचा आलेख मांडला. मल्टीस्टेट च्या सीईओ कविता कुलकर्णी यांनी मान्यवराचे स्वागत केले.


यावेळी डॉक्टर सुमित मोरे यांनी मनोरमा परिवाराच्या भविष्यातील वैद्यकीय क्षेत्रातील कामाची व्याप्ती स्पष्ट केली. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन ॲड. सुरेश गायकवाड यांनी केले तर आभार व्हाइस चेअरमन सुरवसे यांनी मानले .

या शानदार सोहळ्यास मनोरमा बॅन्क व मल्टीस्टेट चे संचालक डॉ. ऋचा मोरे पाटील, डॉ. मिताली मोरे, डॉक्टर आदित्य पाटील, राजकुमार खरटमोल, दत्ता मुळे , सुहास भोसले, अभियंता संघटनेचे मिलिंद भोसले , गजेंद्र साळुंखे, मनोरमा च्या सि.ई.ओ. शिल्पा मोहिते, कमलाकर पुजारी, निलकंठ करंडे , सुनिल पाटील, माजी उपमहापौर प्रविण डोंगरे आदींसह ठेवीदार कर्मचारीं सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सोलापूरच्या सर्वांगीण विकासासाठी 'मित्र' संस्थेचे बहुपर्यायी उपक्रम

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):–** सोलापूर जिल्ह्याच्या आर्थिक आणि सामाजिक विकासाला गती देण्यासाठी महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्स्फॉर्मेशन (मित्र) या संस्थेच्या उपक्रमांची महत्त्वपूर्ण भर पडणार आहे. उजनी जलाशय पर्यटन केंद्र, आयटी पार्क, डाळिंब क्लस्टर, महिला बचतगटांचे उत्पादन, पारंपरिक उद्योग आणि स्वयंरोजगार संधी यावर लक्ष केंद्रित करत जिल्ह्याच्या प्रगतीसाठी बहुपयार्यी योजना राबवण्यात येणार आहेत.

महास्ट्राराईड प्रकल्पांतर्गत नुकतीच सोलापूर जिल्ह्याची आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीस मित्रचे उपाध्यक्ष तथा आमदार राणाजगजितसिंह पाटील, जिल्हाधिकारी श्री कुमार आशीर्वाद, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री कुलदीप जंगम, महापालिका व विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.




### उजनी जलाशय पर्यटन केंद्र

बैठकीत उजनी धरण परिसरात पर्यटन केंद्र विकसित करण्याबाबत सविस्तर चर्चा झाली. पक्षी निरीक्षण, वॉटर स्पोर्ट्स, बोटिंग, रिसॉर्ट्स आदी सुविधा उपलब्ध करून पर्यटकांना आकर्षित करणे आणि स्थानिकांना रोजगार उपलब्ध करून देणे हे या उपक्रमाचे उद्दिष्ट आहे. जिल्हाधिकारी श्री कुमार आशीर्वाद यांनी या संदर्भात सादरीकरण केले.

### सोलापूर- मेडिकल हब

सोलापूर शहरात विविध तज्ज्ञ डॉक्टरांची उपस्थिती आणि उच्च दर्जाच्या वैद्यकीय सुविधा उपलब्ध असल्यामुळे शहराला 'मेडिकल हब' म्हणून विकसित करण्याची गरज असल्याचे आमदार पाटील यांनी नमूद केले.

### डाळिंब क्लस्टर आणि प्रक्रिया उद्योग

सोलापूर जिल्हा डाळिंब उत्पादनासाठी प्रसिद्ध आहे. या पार्श्वभूमीवर डाळिंब क्लस्टर स्थापन करून प्रक्रिया, मूल्यवर्धन आणि निर्यात वाढवण्यावर भर दिला जाणार आहे.

### आयटी पार्क आणि कृत्रिम बुद्धिमत्ता

सोलापुरात आयटी पार्क उभारण्याची प्रक्रिया सुरू असून, आर्टिफिशियल इंटेलिजन्ससह आधुनिक तंत्रज्ञानाच्या विकासाला 'मित्र' संस्थेचा पाठिंबा मिळणार आहे.

### शेंगाचटणी ब्रँडला चालना

महिला बचतगटांद्वारे उत्पादित 'रुक्मिणी' शेंगाचटणी ब्रँडला बाजारपेठ मिळवून देण्यासाठी ह्यमित्रह्ण पुढाकार घेणार आहे. पारंपरिक वस्त्रोद्योग आणि विडी उद्योगालाही बळ दिले जाणार आहे.

### जोडधंद्यांना प्रोत्साहन

रेशीम उद्योग, शेळीपालन यांसारख्या ग्रामीण जोडधंद्यांना प्रोत्साहन देण्यासाठी रेल्वे विभागाच्या उपलब्ध जमिनींचा वापर केला जाणार आहे. अक्कलकोट रोड औद्योगिक वसाहतीत रस्ते व पायाभूत सुविधा विकसित करण्याबाबतही चर्चा झाली.

### रोजगारनिर्मिती आणि स्वयंरोजगार

तरुण आणि महिलांसाठी स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण करण्यावर भर देण्यात येणार असून, जिल्हा उद्योग केंद्र व विविध महामंडळांच्या योजनांचा लाभ संबंधित घटकांना मिळवून देण्यात येणार आहे.

### जागतिक बँक व राज्य सरकारचा सहभाग

महास्ट्राराईड हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प राज्य सरकार आणि जागतिक बँक यांच्या सहकार्याने ह्यमित्रह्ण संस्थेमार्फत राबवला जात आहे.

या उपक्रमांमुळे सोलापूर जिल्ह्याचे दरडोई उत्पन्न वाढून आर्थिक विकासाला गती मिळेल, असा विश्वास आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केला.

# अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून नुकसान भरपाई द्या..

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** सोलापूर शहरात झालेल्या महाभयंकर पावसामुळे, शहरातील सकल भागात व झोपडपट्टयांमध्ये नागरिकांचे जीवन धोक्यात आले आहे. व मोठ्या प्रमाणात कौटुंबिक आर्थिक नुकसान झाले आहे. त्यामुळे झालेल्या नुकसानीचे त्वरित पंचनामे करावे व शहरातील सर्व झोपडपट्टयात आरोग्यसेवा वाढवावी., अशा मागणीचे निवेदन मी सोलापूर माझे सोलापूर परिवर्तन व विकास समितीच्या वतीने सोलापूर महानगरपालिकेचे आयुक्त यांना देण्यात आले आहे.



मा. महानगरपालिका आयुक्त यांना देण्यात आलेल्या निवेदनात, संपूर्ण सोलापूर शहरात ११ सप्टेंबर रोजी पहाटे झालेल्या अतिवृष्टीमुळे सोलापूर शहरातील सकल भागात व सर्व झोपडपट्टयात जलमय परिस्थिती निर्माण झाली आहे., पाऊस इतका मोठ्या प्रमाणात झाला आहे की सोलापूर शहरात सर्वत्र व झोपडपट्टी भागात पाणीमय होऊन गटारी शौचालय व सांडपाणी एकत्रित येऊन संपूर्ण सोलापूर दुर्गंधीयुक्त झाले आहे. एकीकडे सध्या दूषित प्रदूषण त्यात भर म्हणून आजार मोठ्या प्रमाणात वाढत आहेत., घराघरात, आमरस्त्यावर झोपडपट्टयात पाणीच पाणी झाले आहे. यापूर्वीही मैला मिश्रित पाण्यामुळे जगजीवनराम झोपडपट्टीत दोन अल्पवयीन विद्यार्थिनींचे निधन झाले आहे. ते सुरळीत होते की नाही, इतक्यात या पावसाने थैमान माजविले आहे.

तरी माननीयांनी निवेदनातील सर्व बाबींची दखल घेऊन, योग्य ते उपाय करून सोलापूर शहरवासी यांचे जीव वाचवावे., असे सदर निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

### प्रमुख मागण्या

१. सर्व झोपडपट्टयांचे पुनर्वसन योजनेअंतर्गत कामकाज सुरू करावे २. झोपडपट्टयांमध्ये महापालिकेच्या वतीने आरोग्य शिबिरे आयोजित करावे. ३. साचलेले पाणी हटविण्यासाठी उपाययोजना कराव्यात ४. परत पाऊस आला तरी पाणी साचू नये यासाठी उपाययोजना कराव्यात. ५. लहान मुलांच्या आरोग्यासाठी चलता दवाखाना वाहन संपूर्ण शहरात फिरविण्यात यावे ६. ठिकठिकाणी आपतग्रस्त संदेश देण्याकरिता स्वयंचलित यंत्रणा सुरू करावी ७. अतिवृष्टी झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून नुकसान भरपाई त्वरित देण्यात यावी. ८. श्री छत्रपती शिवाजी सर्व उपचार रुग्णालयात अतिवृष्टीग्रस्त लोकांच्या आरोग्यासाठी स्वतंत्र विभाग सुरू करावा. अशा मागण्यांचा समावेश करण्यात आला आहे.

विष्णू कारमपुरी (महाराज) व श्रीनिवास चिलवेरी यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देणाऱ्या शिष्टमंडळात गुरुनाथ कोळी, विठ्ठल कुराडकर, पप्पू शेख, श्रीनिवास बोगा, रूपाली मिरगाळे, गीता भागवत, बालमनी गजेली, सुवर्णा कोमाकुल, मीनाक्षी मुषण, अर्चना पाटील, ललिता येलका,

व्यंकटेश कोंगारी, पद्मा साका , वंदना गुत्तीकोंडा, रेणुका मच्छा, भाग्यलक्ष्मी श्रीमल, पद्मावती सग्गम, सपना चंदनशिवे, गिताबाई ईरागंटी,अंबिका माने स्वाती शिंदे, रेखा आडकी, राधिका मिठ्ठा, सविता दासरी, पद्मा मॅकल, शरणाप्पा जगले यांच्यासह मोठ्या प्रमाणात विडी कामगार महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# केळी व्यापाऱ्याने दिलेला धनादेश न वटल्याने व्यापाऱ्यास शिक्षा व दंड



**अकलूज (कटूसत्य वृत्त):–** सुखदेव भगवान जाधव रा. जाधववाडी ता. माळशिरस या शेतकऱ्याने, केळीचा पुरवठा फलटण येथील सिकंदर बागवान या व्यापाऱ्यास केला होता. त्या कामी व्यापारी सिकंदर बागवान याने, रक्कम साठ हजार रुपये किमतीचा चेक, जाधव यांना दिला होता. परंतु जाधव यांनी तो चेक स्वतःच्या खात्यावर भरला असता न वटता परत आला. त्यावेळी त्यांनी ॲड. जी पी कदम यांच्यामार्फत नोटीस पाठवून फौजदारी खटला, माळशिरस कोर्टात दाखल केला होता. या खटल्यात प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी व्यास सो यांनी आरोपी सिकंदर बागवान रा. मलटण ता. फलटण यास दि 9 सप्टेंबर 2025 रोजी तुरुंगवास, दंड आणि फिर्यादी यांना चेकची रक्कम नुकसान भरपाई म्हणून देण्याचे आदेश दिला. या खटल्यात आरोपीने बचाव घेतला होता की ,सदरचा चेक हा फिर्यादी यांना कर्ज रकमेला जामीन म्हणून दिला होता. फिर्यादीतर्फे ॲड जी पी कदम ॲड विशाल जाधव यांनी कोर्टाच्या निर्देश आणून दिले की, सदर फिर्यादीच्या नोटीस आरोपीने उत्तर दिले नाही व सदर चेक वरील सही आरोपीने मान्य केली आहे ती नाकारली नाही.या एकत्रीवादाच्या समर्थनार्थ मा सर्वोच्च न्यायालयाचे निकाल फिर्यादीचे वकील ॲड जी पी कदम, ॲड विशाल जाधव यांनी न्यायालयास सादर केले. सदरचा युक्तिवाद कबूल करून मे कोर्टाने आरोपीस 3 महीने तुरुंगवास व 1 लाख रुपये दंड व नुकसान भरपाई देण्याचे आदेश केला.

# न्यासाकडून अत्यंत अप्रतिम योजना आणि सेवा- आरोग्य अधिकारी डॉ. जुही पवार

**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):–** श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यासाकडून अत्यंत अप्रतिम योजना आणि सेवा स्वामी भक्तांना दिली जात असल्याचे मनोगत महाराष्ट्र राज्याचे आरोग्य दूत व छत्रपती शिवाजी महाराज रेल्वे टर्मिनल (स्टेशन) नजीक असलेल्या शासनाचे सेंट जॉर्ज रुग्णालयाच्या आरोग्य अधिकारी डॉ. कु. जुही पवार यांनी व्यक्त केल्या.



त्या श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ येथे आले असता न्यासाचे पुरोहित संजय कुलकर्णी यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा, कृपावस्त्र, श्रीफळ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. या प्रसंगी त्या बोलत होते.

त्यांच्या समवेत डॉ. किरण पवार, गौरव पवार (जळगाव) हे उपस्थित होते.यावेळी शहाजी यादव, शुभम सावंत, सतीश महिंद्रकर, श्रीनिवास गवंडी, दत्ता माने, लक्ष्मण बिराजदार, तानाजी पाटील, राजू पवार, रमेश हेगडे, प्रसाद हुल्ले, शरद भोसले, अनिल बिराजदार, एस के स्वामी, सिद्धाराम कल्याणी, महांतेश स्वामी, शिव स्वामी, श्रीकांत स्वामी, शावरेप्पा माणकोजी, मल्लिनाथ कोगनुरे, विशाल घाडगे, धनंजय निंबाळकर, समर्थ चव्हाण, विठ्ठल रेड्डी यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.

# प्रताप क्रीडा मंडळाची ४७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीत संपन्न

**अकलूज (कटूसत्य वृत्त):–** भविष्यात विद्यार्थी व समाज हा मानसिक, शारीरिक तंदुरुस्ती व आनंदी कसा राहील याकरिता प्रताप क्रीडा मंडळ कार्यरत राहणार आहे.मंडळाने कला, क्रीडा, सांस्कृतिक, सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय काम केले असून यातून अनेकांचे भवितव्य घडले असल्याचे मंडळाचे अध्यक्षा कु.स्वरूपाराणी मोहिते पाटील यांनी सांगितले. कृष्णप्रिया मल्टीफंक्शन हॉल येथे प्रताप क्रीडा मंडळाची ४७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा कु.स्वरूपाराणी मोहिते पाटील यांच्या अध्यक्षतेखाली खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली. यावेळी मंडळाचे स्पर्धा नियोजन प्रमुख सयाजीराजे मोहिते




पाटील, उपाध्यक्ष पोपटराव भोसले पाटील प्रमुख उपस्थित होते. यावेळी कु. स्वरूपाराणी मोहिते पाटील बोलत होत्या. पुढे बोलताना त्या म्हणाल्या, सन २०१७ पासून मागील आठ वर्षात मंडळाचे संस्थापक जयसिंह मोहिते पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सकारात्मकतेतून मंडळात नवीन ऊर्जा निर्माण करण्याचा प्रयत्न केला. सध्या राष्ट्रीय पातळीवरील होणार्या घडामोडींचे परिणाम समाजावर होऊ लागले आहेत. सध्याचे युद्ध हे बौद्धिक गुणवत्तेच्या जोरावर होत आहे. समाजात शारीरिक, मानसिक, बौद्धिक व भावनिक गोष्टीवर काम करणे गरजेचे आहे. जात, धर्म, प्रांत यामध्ये न अडकता खऱ्या अथार्ने समाजासाठी काम करणे गरजेचे आहे. शिक्षित असण्याबरोबरच सुशिक्षित होणेही महत्त्वाचे आहे. पुढील वर्षी राष्ट्रीय पातळीवरील कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यासाठी प्रयत्न व्हावा अशी अपेक्षाही त्यांनी यावेळी व्यक्त केली.

सयाजीराजे मोहिते पाटील यांनीही मंडळाच्या विविध उपक्रमांना शुभेच्छा दिल्या तर सचिव बिभीषण जाधव यांनी कला, क्रीडा, सांस्कृतिक क्षेत्रात काम करणारे प्रताप क्रीडा मंडळ हे राज्यात अग्रेसर असल्याचे सांगितले.

सभेपुढील सहा विषयाचे वाचन सचिव बिभीषण जाधव व सदस्यांनी केले. त्यास एकमताने मंजुरी देण्यात आली. यावेळी मंडळाचे सदस्य प्रताप पाटील, वसंत जाधव, यशवंत माने देशमुख, डॉ .विश्वनाथ आवड, बाळासाहेब सावंत, रामचंद्र मिसाळ, राहुल गायकवाड, भीमाशंकर पाटील, विशाल लिके, संजय झंजे, नंदकुमार गायकवाड, सुहास थोरात, फिरोज तांबोळी यांच्यासह सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन किरण सूर्यवंशी यांनी केले.

[redacted]

[redacted]

[redacted]

[redacted]

[redacted]

[redacted]

[redacted]